
# करोना रुग्णालये अन्य उपचारांसाठी खुली

## आरोग्य विभागाच्या जिल्ह्यांना सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** रुग्णसंख्या कमी झाली तरी करोना संसर्गाच्या संभाव्य दुसऱ्या लाटेच्या अनुषंगाने बाधित रुग्णांच्या प्रमाणानुसार जिल्ह्यातील रुग्णालयांचे व्यवस्थापन करण्याच्या सूचना आरोग्य विभागाने जिल्ह्यांना दिल्या आहेत. तसेच करोना आणि बिगरकरोना उपचारांचा मेळ साधण्यासाठी आधुनिक सुविधांसह उपचार विशेष (सुपर स्पेशालिटी) रुग्णालये करोना रुग्णालये म्हणून ठेवण्याची आवश्यकता नाही, असे आदेशही सर्व जिल्ह्यांना दिले आहेत. यामुळे अन्य रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

करोना साथीच्या काळात सरसकट सर्वच आरोग्य व्यवस्था करोना केंद्री झाल्याने इतर आजारांच्या सेवा काही प्रमाणात खंडित झाल्या होत्या. आधुनिक उपचार देणारी सुपरस्पेशालिटी रुग्णालये करोना रुग्णालये म्हणून कार्यरत असल्याने तातडीच्या नसलेल्या अनेक शस्त्रक्रिया रखडलेल्या आहेत. संसर्गाची तीव्रता गेल्या काही दिवसांपासून कमी झाल्याने आता इतर आजारांच्या सुविधाही उपलब्ध करण्याच्या उद्देशातून रुग्णोपचार व्यवस्थेत बदल करण्याचे आदेश आरोग्य विभागाने सर्व जिल्ह्यांना दिले आहेत.



रुग्णसंख्येच्या प्रमाणानुसार करोना उपचाराची पूर्ण जबाबदारी जिल्हा आणि शहरातील विशिष्ट रुग्णालयांवर सोपवावी. सुपरस्पेशलिटी रुग्णालये करोना रुग्णालये ठेवण्याची आवश्यकता नाही, असे यात स्पष्ट केले आहे. जिल्हा रुग्णालये, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये करोना आणि इतर आजारांच्या सुविधांचा समतोल साधला जावा.

प्रत्येक तालुक्यासाठी विशिष्ट करोना निगा केंद्र (सीसीसी), करोना आरोग्य केंद्र (डीएचसी) आणि करोना रुग्णालये निश्चित करावीत. असे जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावरील करोना कृती दलाला सूचित केले आहे.

संसर्ग नियंत्रणासाठी क्षेत्रीय पातळीवर पथके

घरगुती विलगीकरणात अधिक रुग्ण असून यांची देखरेख करण्यासाठी जिल्हा आणि पालिका पातळीवर सूक्ष्मनियोजन करावे. रुग्णसंख्या कमी झाली तरी निकट सहवासितांचा सखोल शोध आणि तपासण्या कराव्यात. वृद्धाश्रम, स्थलांतरित मजूर वस्ती, औद्योगिक वसाहती इत्यादी प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी विशेष लक्ष द्यावे. यासाठी उपकेंद्र आणि वॉर्डस्तरावर पथके कार्यरत करण्याचे सूचित केले आहे.

### आदेशातील मुद्दे

- बाधितांचे प्रमाण सात टक्क्यांपेक्षा कमी असल्यास रुग्णसंख्येनुसार जिल्हा आणि पालिका स्तरावर किमान पाच ते सात करोना रुग्णालये कार्यरत ठेवावीत.
- सात ते दहा टक्के बाधितांचे प्रमाण असलेल्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि प्रत्येक शहरी आणि तालुका विभागातील एक रुग्णालय करोना रुग्णालय म्हणून कार्यान्वित करावे.
- बाधितांचे प्रमाण ११ ते १५ टक्के असल्यास आवश्यकतेनुसार आणखी २० टक्के करोना रुग्णालये कार्यान्वित करावीत.
- १६ ते २० टक्के बाधितांचे प्रमाण असलेल्या ठिकाणी विविध आजारांचे उपचार देणारी मल्टीस्पेशालिटी रुग्णालये करोनासाठी कार्यान्वित करावीत तर २० टक्क्यांहून अधिक बाधितांचे प्रमाण असल्यास करोनासाठी या आधी निवडलेली सर्व प्रकारची रुग्णालये करोना उपचारासाठी खुली करावीत, असे यात नमूद केले आहे.

### अतिजोखमीच्या व्यक्तींची तपासणी

माझे कुटुंब माझी जबाबदारी अंतर्गत नोंद झालेल्या अतिजोखमीच्या व्यक्तीची यादी उपकेंद्र आणि वॉर्ड स्तरावरील आरोग्य कर्मचाऱ्यांना देऊन त्यांची दर आठवड्याला तपासणी करण्यात यावी, असे यात म्हटले आहे.

### उपचारांच्यादृष्टीने पुनर्प्रशिक्षण

करोना साथीच्या सुरुवातीच्या टप्प्यात उपचाराच्या दृष्टीने प्रशिक्षण घेतले असले तरी दरम्यानच्या काळात नव्याने समोर आलेल्या बाबी, वैद्यकीय उपचार नियमावलीतील बदल या अनुषंगाने पुनर्प्रशिक्षण घेण्याचे आदेशही विभागाने दिले आहेत.

### ५० टक्के औषध साठा आवश्यक



करोनाचा प्रादुर्भाव अधिक असलेल्या काळात आवश्यक असलेल्या औषध आणि इतर सामुग्रीच्या किमान ५० टक्के औषधे नेहमी उपलब्ध राहतील, याची दक्षता रुग्णालय आणि जिल्हा किंवा महानगरपालिका स्तरावर घ्यावी. तसेच पुढील १५ दिवसांचा साठाही करून ठेवावा, असे आदेशही आरोग्य विभागाने दिले आहेत.

# शिक्षकांना लोकल प्रवासाची मुभा

## रेल्वे मंत्रालयाची मंजुरी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** रेल्वे मंत्रालयाने शालेय शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना उपनगरीय रेल्वेमधून प्रवासाची परवानगी दिली आहे. राज्य सरकारने यासाठी मध्य आणि पश्चिम रेल्वेला विनंती केली होती.

दिवाळीनिमित्त २० नोव्हेंबरपर्यंत शाळेला सुट्टी आहे. मात्र दहावीच्या फेरपरीक्षेच्या कामानिमित्त शिक्षकांना १९ नोव्हेंबरपासून शाळेत जावे लागणार आहे. तर २३ नोव्हेंबरपासून ९ वी ते १२ वीचे वर्गही सुरू होत आहेत. त्यासाठी राज्य सरकारच्या वतीने मुंबई व उपनगरातील शिक्षक तसेच अन्य कर्मचाऱ्यांना लोकल प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली होती.

यासंदर्भातील निवेदन पत्र शासनाकडून मध्य आणि पश्चिम रेल्वेकडे ६ नोव्हेंबरला पाठवण्यात आले होते. हे पत्र ११ नोव्हेंबरला मिळाल्याचे रेल्वेकडून सांगण्यात आले. त्यामुळे रेल्वे आणि राज्य सरकारमध्ये नवीनच वाद निर्माण झाला होता. अखेर शुक्रवारी रेल्वे मंत्रालयाने शालेय शिक्षक व कर्मचाऱ्यांना प्रवासाची परवानगी दिली. ओळखपत्रावरच त्यांना स्थानकात प्रवेश दिला जाणार आहे. राज्य सरकारने शाळांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पन्नास टक्के उपस्थिती राखून ऑनलाइन आणि ऑफलाइन वर्ग व इतर शैक्षणिक कामे करण्यास परवानगी दिली आहे.

# मुंबईतील रुग्ण दुपटीचा काळ २४२ दिवसांवर

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईतील करोनाबाधित रुग्णांच्या दुपटीचा काळ सरासरी २४२ दिवसांवर पोहोचला आहे. रुग्णसंख्येत झपाट्याने घट होऊ लागली आहे. मुंबईतील ८०० व्यक्तींना शुक्रवारी बाधा झाल्याचे स्पष्ट झाले, तर १७ रुग्णांचा मृत्यू झाला. आतापर्यंत दोन लाख ६८ हजार ४०४ जणांना करोनाची बाधा झाली आहे.

दुहेरी नोंद आणि मुंबई बाहेरील ३,१२० रुग्णांची संख्या मुंबईतील उपचाराधीन रुग्णांमधून वजा करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांची संख्या १० हजार ५३९ इतकी झाली आहे.

**ठाणे जिल्ह्यात ८ जणांचा मृत्यू**

ठाणे जिल्ह्यात शुक्रवारी ५६८ नवे करोनाबाधित रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात करोनाची लागण झालेल्या एकूण रुग्णांची संख्या २ लाख १८ हजार ५६८ वर पोहोचली आहे. तर, दिवसभरात ८ जणांचा करोनामुळे मृत्यू झाल्याने जिल्ह्यातील मृतांचा आकडा ५ हजार ५०९ इतका झाला आहे.

**राज्यात ४१३२ नवे रुग्ण**

गेल्या २४ तासांत राज्यात ४१३२ नव्या रुग्णांचे निदान झाले असून, १२७ जणांचा मृत्यू झाला. राज्यात आतापर्यंत ९७ लाख २२ हजार नमुन्यांची तपासणी करण्यात आली असता १७ लाख ४० हजार म्हणजेच १७.९ टक्के करोनाबाधित आढळले आहेत. राज्यात सध्या ८४ हजार रुग्ण उपचाराधीन आहेत. दिवसभरात नाशिक १०१, पुणे शहर १८०, पिंपरी-चिंचवड ९१, सोलापूर १८३, नागपूर २२१ नवे रुग्ण आढळले.

## राज्यात काही ठिकाणी तापमानात वाढ

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आठवडाभरात घसरलेल्या किमान तापमानात शुक्रवारी सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली. पुढील दोन दिवसांत राज्यात सरासरी किमान तापमान १५ अंशाच्या आसपास राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर कमाल तापमान सरासरीपेक्षा किंचित कमी राहण्याची शक्यता आहे.

कोरडे हवामान पूर्वेकडे वाहणारे आणि उत्तरेतील थंडी यामुळे राज्याच्या किमान तापमानात आठवडाभरात दहा अंशपर्यंत घसरले होते. त्यामध्ये शुक्रवारी सकाळी काही प्रमाणात वाढ झाली. हवामान विभागाच्या नोंदीनुसार शुक्रवारी सकाळी साडेआठपर्यंतच्या चोवीस तासांत नाशिक आणि जळगाव येथे सर्वात कमी किमान तापमान १४ अंश नोंदविण्यात आले. मध्य महाराष्ट्रात किमान तापमान १४ ते २१ अंश, मराठवाड्यात १७ ते १९ अंश, विदर्भात १७ ते २० अंश दरम्यान होते. मुंबई येथे उपनगरात गेल्या चार दिवसांपासून किमान तापमान १९.६ अंश असून शुक्रवारी त्यामध्ये बदल झाला नाही. शुक्रवारी कोकणात काही भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली. पुढील दोन दिवसांत मुंबईचे किमान तापमान २० अंशाच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

**kotak®**

**KOTAK MAHINDRA PRIME LIMITED**
CIN - U67200MH1996PLC097730
Regd.Office : 27BKC, C 27, G Block, Bandra Kurla Complex, Bandra ( E ), Mumbai - 400 051
Website: www.kotak.com Tel.: 91 22 61660000

**Extract of unaudited financial results for half year ended September 30, 2020**

Amount (₹ in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Half Year ended September 30, 2020 (Unaudited) | Half Year ended September 30, 2019 (Unaudited) | Previous Year ended March 31, 2020 (Audited) |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 1,31,602.92 | 1,64,564.92 | 3,20,152.23 |
| 2 | Net Profit for the year (before Tax, Exceptional and Extraordinary items) | 14,930.28 | 47,275.90 | 81,320.71 |
| 3 | Net Profit for the year before tax (after Exceptional and Extraordinary items) | 14,930.28 | 47,275.90 | 81,320.71 |
| 4 | Net Profit for the year after tax (after Exceptional and Extraordinary items) | 10,952.70 | 32,452.98 | 58,521.52 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 27,209.59 | 47,030.29 | 87,733.23 |
| 6 | Paid up Equity Share Capital (Face Value ₹ 10 per share) | 349.52 | 349.52 | 349.52 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) | 7,69,203.83 | 7,01,221.67 | 7,41,990.58 |
| 8 | Net Worth | 7,69,553.35 | 7,01,571.19 | 7,42,340.10 |
| 9 | Paid up Debt Capital / Outstanding Debt | 17,39,158.38 | 23,33,125.55 | 21,83,139.38 |
| 10 | Outstanding Redeemable Preference Shares | - | - | - |
| 11 | Debt Equity Ratio | 2.26 | 3.33 | 2.94 |
| 12 | Earnings per Share (of ₹ 10 each) (for continuing and discontinued operations) | | | |
| | 1. Basic | 313.36 | 928.50 | 1,674.34 |
| | 2. Diluted | 313.36 | 928.50 | 1,674.34 |
| 13 | Capital Redemption Reserve | 100.00 | 100.00 | 100.00 |

**Notes:**

1) The above results have been reviewed and recommended for Board approval by the Audit Committee and approved and taken on record by the Board of Directors at the meeting held on November 12, 2020. The results have been subjected to "Limited Review" by the statutory auditors.
2) The above is an extract of the detailed format of annual financial results filed with BSE Limited under Regulation 52 of the SEBI (Listing and Other Disclosure Requiremnets) Regulations, 2015. The full format of the annual financial results are available on the websites of BSE Limited at www.bseindia.com and the Company at **www.kotak.com**
3) For the items referred in sub-clauses (a), {d) and (e) of the Regulation 52 (4) of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements), Regulations, 2015, the pertinent disclosures have been made to the BSE Limited and can be accessed on **www.bseindia.com**
4) Figures for the previous year have been regrouped wherever necessary to conform to current period/year presentation.

For and on behalf of Board of Directors

Place: Mumbai
Date : November 12, 2020

**Vyomesh Kapasi**
**Managing Director**

**राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण**
**मुंबई न्यायपीठ**
**कंपनी योजना अर्ज क्र. CA(CAA)/४०६२/ २०१९/MB च्या सहसंबंधीत**
**कंपनी योजना याचिका क्र. CP(CAA)/१०४५/२०२०/MB**

कंपनी कायदा, २०१३ च्या संदर्भात;
आणि
कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २३० ते २३२ च्या संदर्भात
आणि कंपनी कायदा, २०१३ च्या लागू असलेल्या अन्य तरतुदींच्या अंतर्गत
आणि
टीम कंसेप्ट्स प्रायव्हेट लिमिटेड ('टीसीपीएल" किंवा हस्तांतरकर्ता कंपनी)
आणि वॅरॉक पोलीमर्स प्रायव्हेट लिमिटेड ('वीपीपीएल" किंवा 'हस्तांतरिती कंपनी")
आणि त्यांचे संबंधित समभागधारक यांच्या एकत्रितकरण्याचा योजनाप्रकरणाच्यामध्ये

वॅरॉक पोलीमर्स प्रायव्हेट लिमिटेड )
कंपनी कायदा, १९५६ च्या अंतर्गत विधीसंस्थापित असणारी कंपनी )
आणि ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय एल-४, एमआयडीसी, वाळुज, )
औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३११३६, भारत )
सीआयएन U२५२०९MH१९९५PTC०९००३७ )

याचिकादार कंपनी ..........

**याचिकेच्या सुनावणीसाठी सूचना**

टीम कंसेप्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि वॅरॉक पोलीमर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि त्यांचे संबंधित समभागधारक यांच्या एकत्रिकरणाच्या योजना प्रकरणामध्ये प्रस्तावित योजनेची मंजुरीत्तरीता व मान्यतेच्या आदेशासाठी कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २३० पासून २३२ अंतर्गत याचिका याचिकादार कंपनीद्वारे सोमवार, १२ ऑक्टोबर २०२० रोजी राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण (एनसीएलटी)च्या मुंबई न्यायपीठासमोर दाखल करण्यात आली होती आणि माननीय एनसीएलटी यांच्याद्वारे गुरुवार, ५ नोव्हेंबर, २०२० रोजी स्वीकारण्यात आली आहे. माननीय एनसीएलटीच्या मुंबई न्यायपीठासमोर नमूद याचिकेची सुनावणी गुरुवार, ३ डिसेंबर २०२० रोजी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

नमूद याचिकेला सहकार्य किंवा विरोध करण्यास इच्छुक असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्याच्या उद्देशाची सूचना त्याच्या द्वारे किंवा त्यांच्या वकीला द्वारे साक्षांकित करून, त्याच्या/तिच्या नाव आणि पत्त्यासह याचिकादार कंपनीच्या वकिलाकडे याचिकेच्या सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेच्या दोन दिवस अगोदरपर्यंत पोहोचेल अशी पाठवणे आवश्यक आहे. याचिकेस विरोध करायचा असल्यास विरोधाची पार्श्वभूमी किंवा त्याच्या प्रतिज्ञापत्राची प्रत अशा सूचने बरोबर सादर करावी.

निम्नस्वाक्षरीकार यांच्याद्वारे याचिकेची प्रत जर कोणत्याही व्यक्तीला हवी असल्यास त्यासाठी विहित स्वरूपाच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल.

१३ नोव्हेंबर २०२० रोजी दिनांकित

सही/
श्री. टी वि सुरेशकुमार
याचिकादार कंपनीसाठी वकील

पत्ता
जेनिकॉन ॲण्ड असोसिएट्स
ॲडव्होकेट्स अँड लीगल कंसल्टंट्स
#२१-B, पहिला मजला, A.R.K कॉलनी ,
एल्डम्स रोड, अल्वारपेट, चेन्नई - ६०००१८

**UFO**
CINE MEDIA NETWORK

# युएफओ मुव्हीझ इंडिया लिमिटेड

सीआईएन: L22120MH2004PLC285453
नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: वेल्युएबल टेकनो पार्क, प्लॉट -५३/१, रोड -७, एमआयडिसी, मरोल, अंधेरी (पूर्व), मुंबई -४०००९३
फोन : + ९१ (२२) ४०३०५०६०फॅक्स: ९१ (२२) ४०३०५११०
ई-मेल : investors@ufomoviez.com वेबसाईट : www.ufomoviez.com

**३० सप्टेंबर२०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाच्या कालावधी करिता कंसॉलिडेटेड वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

(रु.लाख)

| तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेल अर्ध वर्ष | | संपलेल वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३० सप्टेंबर २० (अलेखापरिक्षित) | ३० जून २० (अलेखापरिक्षित) | ३० सप्टेंबर १९ (अलेखापरिक्षित) | ३० सप्टेंबर २० (अलेखापरिक्षित) | ३० सप्टेंबर १९ (अलेखापरिक्षित) | ३१ मार्च २० (लेखापरिक्षित) |
| परिचलनातून एकूण उत्पन्न | १,२७७ | १,७८० | १२,५१४ | ३,०५७ | २५,१९२ | ५०,३९२ |
| करा पुर्विचा निव्वळ नफा / (तोटा) | -४,०७६ | -४,२७२ | १,१३३ | -८,३४८ | २,४८६ | ५,२१८ |
| कर पश्च्यात निव्वळ नफा (तोटा) | -३,०६६ | -३,३२३ | -३५५ | -६,३८९ | ४६३ | ३,८७७ |
| एकूण व्यापक उत्पन्न | -३,००८ | -३,३६३ | -२३५ | -६,३७१ | ५६८ | ४,२०६ |
| भरणा केलेले समभाग भांडवल | | | | | | २,८३५ |
| इतर इक्विटी | | | | | | ३५,२८६ |
| प्रति समभाग प्राप्ती (प्रत्येकी रु. १०/- च्या) (तिमाही आणि अर्ध वर्षा करिता, वार्षिक नाही) | | | | | | |
| अ) मूलभूत (रु) | -१०.८२ | -११.७२ | -१.२६ | -२२.५४ | १.६३ | १३.६८ |
| ब) सौम्यिकृत (रु) | -१०.८२ | -११.७२ | -१.२६ | -२२.५४ | १.६३ | १३.६८ |

**३० सप्टेंबर२०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि सहा महिन्यांचया कालावधी करिता स्टैंडअलोन वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

| तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेल अर्ध वर्ष | | संपलेल वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३० सप्टेंबर २० (अलेखापरिक्षित) | ३० जून २० (अलेखापरिक्षित) | ३० सप्टेंबर १९ (अलेखापरिक्षित) टीप २ पहा | ३० सप्टेंबर २० (अलेखापरिक्षित) | ३० सप्टेंबर १९ (अलेखापरिक्षित) टीप २ पहा | ३१ मार्च २० (लेखापरिक्षित) |
| परिचलनातून एकूण उत्पन्न | १९५ | १२९ | ८,४९० | ३२४ | १७,७०६ | ३४,८८६ |
| करा पूर्विचा निव्वळ नफा / (तोटा) | -३,५३५ | -३,६८४ | २०४ | -७,२१९ | ५,१३५ | १०,३५६ |
| कर पश्च्यात निव्वळ नफा (तोटा) | -२,६२२ | -२,७६८ | -९८९ | -५,३९० | ३,७३२ | १०,१३२ |
| एकूण व्यापक उत्पन्न | -२,६२२ | -२,७६८ | -१,००० | -५,३९० | ३,७१२ | १०,२३४ |

टिप :

१) वरील विवरण हे सेबी (सूचीकरण बंधने व प्रकटन आवश्यक्ता) विनियमन, २०१५च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजस कडे दाखल करण्यात आलेल्या तिमाही करीताचा वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. लेखापरीक्षण समितीने लेखापरीक्षित आर्थिक निकालांचे परीक्षण १२ नोव्हेंबर २०२० रोजी केले आणि बोर्ड ऑफ डायरेक्टरच्या १२ नोव्हेंबर २०२० रोजीच्या सभेत मंजूर केले गेले.

२) १८ जुलै २०१९ रोजी, यूएफओ मूव्हीज इंडिया लिमिटेड ('कंपनी") आणि व्हॅल्यूएबल डिजिटल स्क्रीन्स प्रायव्हेट लिमिटेड (व्हीडीएसपीएल), जी त्यांची संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे, यांनी व्हीडीएसपीएल आणि कंपनी आणि त्यांच्या संबंधित भागधारकांमधील व्यवस्था योजनेच्या संदर्भात मा. नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनल("एनसीएलटी") यांच्याकडे संयुक्त अर्ज दाखल केला होता. एनसीएलटीने २१ नोव्हेंबर, २०१९ रोजी दिलेल्या त्यांच्या आदेशान्वये कंपनी सह व्हीडीएसपीएलच्या कारवां विभागाचे विभाजन करण्याच्या योजनेस १ एप्रिल २०१९ (नियुक्त तारीख) पासून परवानगी दिली. ही योजना ४ डिसेंबर २०१९ पासून लागू झाली.

ही योजना 'पूलिंग ऑफ इंटरेस्ट' पद्धत वापरुन केली गेली आणि १ एप्रिल, २०१८ पासून प्रत्येक तिमाहीच्या आकड्यांची (स्वतंत्र) पुन्हा अशा प्रकारे मांडणी केली गेली कि व्यवसाय एकीकरणांवर इंड एएस १०३ च्या परिशिष्ट 'सी' च्या आवश्यकतेनुसार विभाजन जणू १ एप्रिल, २०१८ पासून केले गेले. योजनेच्या अनुषंगाने, कारवां विभागाशी संबंधित सर्व मालमत्ता, उत्तरदायित्व, उत्पन्न आणि खर्चाची वहन रक्कम कंपनीकडे हस्तांतरित केली गेली.

३) मागीलवर्षाची/ कालावधीची आकडेवारी आवश्यकता असेल तेथे विद्यमान कालावधी वर्गीकरणाशी सुसंगत होण्यासाठी पुनर्समूह/ पुनर्वर्गीकृत करण्यात आली आहे.

४) वित्तीय निष्कर्षाची संपूर्ण प्रारुप कंपनीची वेबसाइट www.ufomoviez.com वर तसेच स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाटस www.bseindia.com व www.nseindia.com वरही उपलब्ध आहे.

**संचालक मंडळाच्या वतीने आणि**
**युएफओ मुव्हीझ इंडिया लिमिटेड करिता**
**सही/ -**
**कपिल अगरवाल**
**संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : १२.११.२०२०**

**BOROSIL®**

# बोरोसील लिमिटेड

**(पूर्वीची होपवेल टेबलवेअर लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)**
**सीआयएन : एल३६१००एमएच२०१०पीएलसी२९२७२२**
**नोंदणीकृत कार्यालय :** ११०१, क्रीसेन्झो, जी-ब्लॉक, एमसीए क्लब समोर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१.
**फोन क्र. :** ०२२-६७४०६३०० **फॅक्स क्र. :** ०२२-६७४०६५१४ **वेबसाईट :** www.borosil.com **ई-मेल:** borosil@borosil.com

**३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीकरिता अलेखापरिक्षीत स्वतंत्र आणि एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

(₹ लाखांमध्ये नमूद केल्याप्रमाणे वगळता)

| तपशील | स्वतंत्र | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाही अखेर (३०/०९/२०२०) | सहामाही अखेर (३०/०९/२०२०) | तिमाही अखेर (३०/०९/२०१९) | तिमाही अखेर (३०/०९/२०२०) | सहामाही अखेर (३०/०९/२०२०) | तिमाही अखेर (३०/०९/२०१९) |
| परिचलनातून एकूण उत्पन्न | १२,६४४.९५ | १६,८८१.८३ | १६,३७०.४१ | १३,९३९.०० | १९,५४८.५८ | १७,४३९.७२ |
| कालावधीकरिता निव्वळ नफा करपूर्व आणि अपवादात्मक बाबींपूर्वी | १,२६८.६८ | १२६.७९ | २,१४१.९३ | १,२९८.८२ | २४६.३२ | २,०२३.७२ |
| कालावधीकरिता कर पूर्व निव्वळ (अपवादात्मक बाबींपश्चात) | १,२६८.६८ | १२६.७९ | २,१४१.९३ | १,२९८.८२ | २४६.३२ | २,०२३.७२ |
| कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा (अपवादात्मक बाबींपश्चात) | ९११.३६ | १०८.३४ | १,७७५.०८ | ९३५.५६ | १९९.१७ | १,६८५.५५ |
| कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश) | ९०९.८९ | ९४.२९ | १,७७३.४० | ९३४.०० | १८४.९३ | १,६८८.३२ |
| समभाग भांडवल | १,१४०.६० | १,१४०.६० | - | १,१४०.६० | १,१४०.६० | - |
| इक्वीटी शेअर सस्पेंस खाते (टीप २ पहा) | - | - | १,१४०.६० | - | - | १,१४०.६० |
| इतर इक्वीटी (पुनर्मूल्यांकन उपलभ्य वगळून बॅलन्सशीटमध्ये दाखविल्याप्रमाणे) | - | - | - | - | - | - |
| **प्रति समभाग मिळकत (₹ मध्ये) (दर्शनीमूल्य ₹ १/- च्या मूल्याप्रमाणे) (टीप २ पहा)** | | | | | | |
| मूलभूत (अवार्षिकीकृत)* | ०.८०* | ०.०९* | १.५६* | ०.८२* | ०.१६* | १,४८* |
| सौम्यिकृत (अवार्षिकीकृत)* | ०.८०* | ०.०९* | १.५६* | ०.८२* | ०.१६* | १,४८* |

**टिप :**

१. वरील उतारा दि. ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठी सविस्तर अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रिकृत वित्तीय निष्कर्ष सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दि. १३ नोव्हेंबर, २०२० रोजी सादर केलेल्या निष्कर्षांचा उतारा आहे. सदर वित्तीय निष्कर्षांचा संपूर्ण तपशील स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईट (**www.bseindia.com** आणि **www.nseindia.com**) आणि कंपनी वेबसाईट (**www.borosil.com**) वर उपलब्ध आहेत.
२. ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी समभाग अनामत खाते हे योजनेच्या अनुसार डिमर्ज्ड कंपनीच्या समभागधारकांना जारी करण्याचे प्रलंबित समभाग दर्शवतात आणि त्यानुसार इंडियन अकाऊंटिंग स्टॅंडर्ड (इंड एएस) ३३ अनुसार नमूद त्रैमासिकासाठी प्रती भाग उत्पन्न (ईपीएस) मोजण्यात विचारात घेण्यात आले आहे.
३. कंपनीचे वरील निष्कर्ष दि. १३ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या सभेत लेखापरिक्षण समितीद्वारे पुनर्विलोकीत करण्यात आले आणि संचालक मंडळाद्वारे मंजूर करण्यात आले. कपनीच्या वैधानिक लेखापरिक्षकांद्वारे वरील निष्कर्षांचे मर्यादित परिक्षण करण्यात आले.

**बोरोसिल लिमिटेड करिता**
**(पूर्वीची होपवेल टेबलवेअर लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)**

**श्रीवर खेरुका**
व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ
(डीआयएन : ०१८०२४१६)

स्थळ : मुंबई
दिनांक : १३.११.२०२०